स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जा.क्र.कबचौउमवि/१६/ईमेल/२०२४ दिनांक :- १५ जानेवारी २०२४

---

जळगाव दि. १५ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळेतील मराठी विभागातर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवडयानिमित्त सोमवार दि.१५ रोजी साहित्य सृजन या भित्तीपत्रिकेचे विमोचन करण्यात आले.

वित्त व लेखा अधिकारी सीए रवींद्र पाटील यांच्याहस्ते हे विमोचन झाले. अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख प्रा.म.सु.पगारे होते. महाराष्ट्रातील गाजलेल्या कवींच्या लोकशाही या विषयावरील कवितांचा या भित्तीपत्रकात समावेश करण्यात आला आहे. वाचनाने मन सदृढ होते. आणि सृजनात्मकता निर्माण होते. त्यातून चांगले साहित्यिक घडतात असे सीए रवींद्र पाटील यांनी सांगितले. प्रा.म.सु.पगारे यांनी कवितेच्या माध्यमातून प्रज्ञावंत मन अविष्कृत झाले पाहिजे असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नेत्रा उपाध्ये यांनी केले. महेश सुर्यवंशी यांनी आभार मानले.

## बातमी क्र.२

जळगाव दि. १५ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील योगशास्त्र विभागातर्फे मकर संक्रांती निमित्ताने महिलांसाठी दोन दिवसीय ऑनलाईन योग कार्यशाळा घेण्यात आली.

प्रा.गितांजली भंगाळे यांनी या कार्यशाळेत सुर्यनमस्कार, दीर्घ श्वसन, प्राणायाम पूर्व तयारी आदी बाबत मार्गदर्शन केले. विभागप्रमुख इंजि.राजेश पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ.लिना चौधरी यांनी वजन कमी करण्यास योगिक प्रक्रियांची कशी मदत होते याबाबत मार्गदर्शन केले. महाराष्ट्र, गुजरात, उत्तरप्रदेश, पश्चिम बंगाल, कर्नाटक येथून १०४ महिलांनी या कार्यशाळेत भाग घेतला.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी